नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १९६ Issue - 196 | वार मंगळवार दि. ३ डिसेंबर २०२४ Blow- Tuesday Date 3 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### हलक्या स्वरुपाच्या पावसाचा अंदाज

पुणे : गेल्या काही दिवसांत तापमानात सातत्याने घट होत असल्याने शहर आणि परिसरात हुडहुडी भरवणारी थंडी जाणवत होती. मात्र, 'फेंगल' चक्रीवादळामुळे आता थंडीचा जोर कमी होऊन आता तापमान वाढण्यासह आकाळ ढगाळ झाले आहे. ढगाळ आकाशाची स्थिती आणखी काही दिवस राहणार असून, हलक्या स्वरुपाच्या पावसाचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे. हवेतील कमी झालेली आर्द्रता, कोरडे झालेले वातावरण, उत्तरेकडून येणारे वारे अशा कारणांमुळे शहर आणि परिसरात गारवा वाढला होता. तसेच किमान तापमानात घट होत राहिल्याने थंडीचा जोर वाढत गेला होता. शहरातील पाषाण, शिवाजीनगर अशा काही ठिकाणी ८-९ अंश सेल्सियसपर्यंत तापमान कमी झाले होते. मात्र बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या फेंगल चक्रीवादळामुळे वातावरणात बदल होऊन थंडीचा जोर कमी झाला आहे.

# मुख्यमंत्रीपदासाठी हालचालींना वेग, गुरुवारी शपथविधी

## आज बैठक : महाराष्ट्राचा पुढचा मुख्यमंत्री कोण? भाजपाकडून जोरात हालचाली!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं, सत्ता स्थापनेसाठी शपथविधीचा सोहळाही ठरला. शपथविधीसाठी तारीख, वेळ आणि ठिकाणही ठरलं. पण या दिवशी कोण कोणत्या पदाची शपथ घेणार? मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर कोण बसणार? याबाबत अधिकृत खुलासा झालेला नाही. एकीकडे काळजीवाहू मुख्यमंत्री यांची प्रकृती बिघडली असल्याने त्यांनी सर्व बैठका रद्द केल्या आहेत. तर दुसरीकडे अजित पवार चर्चेकरता दिल्लीत गेले आहेत. दरम्यान, ४ डिसेंबरला भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत भाजपाचा विधिमंडळ नेता निवडला जाणार आहे. पीटीआयच्या हवाल्याने टाईम्स नाऊने हे वृत्त दिलं आहे.

राज्यात पुढचा मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर जवळपास शिक्कामोर्तब करण्यात आलंय. मात्र, महायुतीतील अंतर्गत वादामुळे हे नाव जाहीर करण्यास उशीर केला जातोय. सत्ता स्थापनेत माझा कोणताही अडसर नसेल अशी भूमिका मांडलेल्या एकनाथ शिंदे यांनी गेल्या दोन-तीन दिवसांपासून प्रकृती अस्वास्थ्यामुळे सर्व बैठका रद्द केल्या आहेत. त्यामुळे मंत्रिमंडळाची चर्चा रखडली



आहे. दरम्यान, मुख्यमंत्रीपद निश्चित करण्याकरता भाजपाकडून जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. भाजपाने निरिक्षकांची नावे जाहीर केली आहेत.

भाजपाने सोमवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांची महाराष्ट्र विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली. या बैठकीत विधिमंडळ नेता निवडला जाणार आहे. विधीमंडळ नेता म्हणजे जो सरकारचे नेतृत्व करणार म्हणजेच मुख्यमंत्र्याची निवड केली जाणार आहे. रुपाणी आणि सीतारामण बुधवारी मुंबईत भाजपाच्या निवडून आलेल्या प्रतिनिधींची भेट घेणार आहेत. या बैठकीनंतर मुख्यमंत्रीपदासाठी निवडलेल्या उमेदवाराचे नाव दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांना कळवले जाईल. त्यानंतर या निरीक्षकाकडून मुख्यमंत्री पदाच्या उमेदवाराची घोषणा केली जाईल, असं पीटीआयच्या वृत्तात म्हटलं आहे.

शिंदे यांच्या अनुपस्थितीतच पवार यांच्याशी चर्चा करून भाजपाने शपथविधी समारंभ ५ डिसेंबरला आयोजित करण्याची घोषणा केली. पण अजून महायुतीतील तीनही पक्षांना किती मंत्रीपदे मिळावीत, खातेवाटप कसे असावे आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्याकडून मंत्रीपदांसाठी कोणाची निवड केली जाणार, या बाबींवर शिंदे, फडणवीस व पवार यांच्यात सोमवारपासून चर्चा सुरू होणार होती. परंतु, एकनाथ शिंदे यांची प्रकृती ठीक नसल्याने त्यांनी सर्व बैठका रद्द केल्या. शिंदे, फडणवीस आणि अजित पवार यांच्यातील चर्चेतून मंत्र्यांची संख्या आणि खातेवाटपावरून तोडगा निघाला नाही तर पुन्हा दिल्लीत चर्चेची आणखी एक फेरी होऊ शकते, असेही सांगण्यात येत आहे. शिंदे हे माघार घेण्याच्या मन:स्थितीत नाहीत हेच त्यांच्या देहबोलीवरून स्पष्ट झाले. त्यामुळे बुधवार, ४ डिसेंबरलाच नव्या मुख्यमंत्र्याचं नाव जाहीर करण्याते येणार आहे. दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांचं नाव मुख्यमंत्री पदासाठी जवळपास निश्चित झाल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे चार डिसेंबरला त्यांचंच नाव जाहीर होऊ शकतं.

# मतदान केंद्रावरील मतदारांची संख्या १२०० वरून १५०० का केली?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नवी दिल्ली : महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर विरोधकांकडून टीका केली जात आहे. ईव्हीएममध्ये गैरप्रकार झाल्याचा आरोप केला जात असून त्यामुळेच सत्ताधाऱ्यांना इतका मोठा विजय मिळाला, असा दावा विरोधक करत आहेत. याच पार्श्वभूमीवर आता सर्वोच्च न्यायालयाने एका याचिकेच्या सुनावणीदरम्यान निवडणूक आयोगाला मतदारसंख्या वाढवण्याबाबत विचारणा केली आहे. तसेच, यासंदर्भात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचेही आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

### सर्वोच्च न्यायालयाची निवडणूक आयोगाला विचारणा!

भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना व न्यायमूर्ती पी. व्ही. संजय कुमार यांच्या खंडपीठासमोर आज यासंदर्भातल्या याचिकेची सुनावणी झाली. यावेळी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारसंख्या १२०० वरून १५०० पर्यंत का वाढवली? अशी विचारणा न्यायालयाने केली. यासंदर्भात याचिकाकर्त्याच्या मागणीनुसार न्यायालयाने निवडणूक आयोगाला नोटीस बजावण्यास नकार दिला. मात्र, त्याचवेळ आयोगाला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले.

ऑगस्ट २०२४ मध्ये निवडणूक आयोगाकडून मतदारसंख्या वाढवण्यात आल्याबाबत माहिती जारी करण्यात आली होती. त्याला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. इंदू प्रकाश सिंग नावाच्या व्यक्तीने ही याचिका दाखल केली होती. निवडणूक आयोगाने घेतलेला निर्णय कोणत्याही आकडेवारी वा तथ्याशिवाय घेतल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. याआधी २७ ऑक्टोबर रोजी सुनावणीदरम्यान केलेल्या युक्तिवादात याचिकाकर्त्याने मतदानासाठी लागणाऱ्या कालावधीचा उल्लेख केला होता. 'मतदारांची संख्या १२०० वरून १५०० केल्यामुळे मागासवर्ग निवडणूक प्रक्रियेतून बाहेर पडेल. कारण यामुळे मतदानाचा कालावधी वाढेल. शिवाय, प्रक्रियेला लागणाऱ्या विलंबामुळे मतदार मतदानासाठी येण्यास टाळाटाळ करू शकतील', असा युक्तिवाद करण्यात आला होता.

दरम्यान, २०१९ पासूनच मतदारांची संख्या वाढवण्यात आल्याचा युक्तिवाद निवडणूक आयोगाकडून यावेळी करण्यात आला. २०१९ पासून मतदारसंख्या १५०० करण्यात आली आहे. तेव्हापासून यावर कोणतीही तक्रार आलेली नाही. जर सगळेच जण दुपारी ३ नंतर मतदानाला यायला लागले, तर मग त्यावर काय करता येणार? अशी हतबलता आयोगाकडून व्यक्त करण्यात आली. यावेळी नोटीस जारी करू नये, अशी विनंती आयोगाकडून करण्यात आली. यासंदर्भात कोणतीही नोटीस जारी करण्यात येऊ नये, ईव्हीएमविरोधात अनेक आरोप केले जात आहेत. जर आपण त्या प्रत्येक आरोपाच्या खालात जायला लागलो तर अवघड होईल. मतदारसंख्या वाढवण्याआधी सर्व राजकीय पक्षांशीही सल्लामसलत करण्यात आली होती, असं निवडणूक आयोगाकडून नमूद करण्यात आलं. यानंतर न्यायालयाने आयोगाला यासंदर्भातील माहिती देणारं प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

# सोलापूर पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) पोलीस आयुक्तालयात कार्यरत असणाऱ्या १३ पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय स्तरावर अंतर्गत बदल्या केल्या आहेत.पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांच्या सहीने या बदल्या करण्यात आले आहेत. यात पोलीस निरीक्षक दत्तात्रय कोकरे यांची नियंत्रण कक्षात,पोलीस निरीक्षक संतोष कोकरे यांची आर्थिक गुन्हे शाखेत,सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री गणेश कवितके यांची आर्थिक गुन्हे शाखेत,सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय काळे यांची आर्थिक गुन्हे शाखेतून गुन्हे शाखेकडे बदली करण्यात आली आहे.सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनाथ महाडिक यांची गुन्हे शाखेकडून जोडवाडी पेठ पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. साह.पोलीस निरीक्षक दादासाहेब मोरे यांची गुन्हे शाखेकडून एमआयडीसी पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. साह.पोलीस निरीक्षक तुकाराम घाडगे यांची आर्थिक गुन्हे शाखेकडून गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे. साह पो.निरीक्षक रोहन खंडागळे यांची दंगा नियंत्रण पथकाकडून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे यांची गुन्हे शाखेकडून आर्थिक गुन्हे शाखेत,पोलीस उपनिरीक्षक गोविंद पवार यांची नियंत्रण कक्षातून कोर्ट पैरवी,पोलीस उपनिरीक्षक प्रवीण भोपळे यांची सायबर पोलीस ठाण्यात,पोलीस उपनिरीक्षक पवन कुमार अंधारे यांची नियंत्रण कक्षातून दहशतवाद विरोधी पथकात तर पोलीस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड यांची विशेष शाखेतून गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे.




# कर्नाटकमध्ये भीषण अपघातात आयपीएस अधिकाऱ्याचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : कर्नाटकमधील हसन जिल्ह्यात एका आयपीएस अधिकाऱ्याचा अपघातात मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. हर्ष वर्धन असं या मृत अधिकाऱ्याचं नाव असून ते २०२३ च्या बॅचचे कर्नाटक केडरचे आयपीएस अधिकारी होते. दरम्यान, ही अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत हर्ष वर्धन यांचा अपघातात मृत्यू झाला होता. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला.

प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर कर्नाटक केडरमध्ये हर्ष वर्धन यांना पहिली पोस्टिंग मिळाली. पोस्टिंग मिळाल्यानंतर हर्षवर्धन हे आपल्या ड्युटीसाठी जात होते. मात्र, पोस्टिंगसाठी जात असतानाच कर्नाटकच्या हसन जिल्ह्यात त्यांच्या गाडीचा भीषण अपघात झाला. या अपघातात हर्ष वर्धन यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर अनेकांनी हळहळ व्यक्त केली आहे.

दरम्यान, समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार, त्यांच्या गाडीचा अचानक टायर फुटला आणि चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या एका घराला धडकली.

ही धडक एवढी जोराची होती की गाडीचा संपूर्ण चक्काचूर झाला. तसेच गाडीत असलेल्या हर्ष वर्धन यांचा जागीच मृत्यू झाला.

तसेच गाडीचा चालक देखील गंभीर जखमी झाला.

या घटनेची माहिती देताना पोलिसांनी सांगितलं की, हर्ष वर्धन हे सहायक पोलीस अधीक्षक म्हणून आपल्या पहिल्या पोस्टिंगसाठी कर्नाटकमधील हसन जिल्ह्यात झाले होते. मात्र, रस्त्यातच त्यांच्या गाडीचा अपघात झाला. गाडीचा अचानक टायर फुटल्यामुळे हा अपघात झाल्याची माहिती आहे, असं पोलिसांनी सांगितलं. तसेच या अपघातात हर्ष वर्धन यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यांना येथील रुग्णालयात देखील दाखल करण्यात आलं होतं. मात्र, त्याआधीच त्यांचा मृत्यू झाला होता, अशी माहिती सांगितली जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

## सुधीर मुनगंटीवार यांच्या विधानामुळे राज्यभर वेगळीच चर्चा

## माजी अर्थमंत्र्यांनी संभाव्य तारीखच सांगितली!



# लाडकी बहीण योजनेचे २१०० रुपये कधी मिळणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आमचं सरकार आल्यानंतर लाडकी बहीण योजनेचे पैसे आम्ही नोव्हेंबरमध्येच डिसेंबरचे पैसे देऊ असं आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं होतं. तसंच, जाहीरनाम्यात वचन दिल्याप्रमाणे पात्र महिलांना दीड हजार रुपये न देता २१०० रुपये देऊ असं आश्वासनही एकनाथ शिंदे यांनी दिलं होतं. परंतु, आता स्पष्ट बहुमत असतानाही सरकार स्थापन झालेलं नाही. एकनाथ शिंदे आता काळजीवाहू मुख्यमंत्री आहेत. नोव्हेंबर महिनाही सरला आहे, मात्र पात्र महिलांच्या खात्यात लाडकी योजनेचे पैसे जमा झालेले नाहीत.

दरम्यान, भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या विधानामुळे राज्यभर वेगळीच चर्चा रंगली आहे. या विधानावर आता सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. ते एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते.

या मुलाखतीवेळी मुनगंटीवार यांना प्रश्न विचारण्यात आला की निवडणुकीच्या जाहीरनाम्यात महायुतीने आश्वासन दिलं होतं की लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना दिल्या जाणाऱ्या रकमेत वाढ करू. महिलांना १,५०० रुपयांऐवजी २,१०० रुपये देण्याचं आश्वासन तुम्ही दिलं होतं. ते आश्वासन पूर्ण कराल का? कारण राष्ट्रवादीने (अजित पवार) म्हटलंय की हे केवळ एकनाथ शिंदे यांचं आश्वासन होतं. यावर सुधीर मुनगंटीवार म्हणाले, आम्ही १०० टक्के ते आश्वासन पूर्ण करू. महिलांना दिली जाणारी रक्कम १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये अशी वाढवली नाही तर देशभरात आमची प्रतिमा खराब होईल. निवडणुका जिंकल्यानंतर आश्वासन पूर्ण न करणारे अशी आमची प्रतिमा देशभर पसरवली जाईल. मी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार आहे की आपण आपल्या शब्दांवर ठाम राहायला हवं. महायुतीचा जाहीरनामा समितीचा अध्यक्ष या नात्याने मी आमच्या जाहीरनाम्यातून, संकल्प पत्रातून दिलेली आश्वासनं धुळीस मिळू देणार नाही. आमच्या सरकारमध्ये प्रत्येक पात्र महिलेला २,१०० रुपये देण्याची क्षमता आहे. मला वाटत नाही की आमचा कोणताही मित्रपक्ष याला विरोध करेल.

वाढीव रक्कम कधीपासून दिली जाणार? जानेवारी की जुलै, कोणत्या महिन्यापासून ही वाढीव रक्कम द्यायची यावर चर्चा केली जाईल.

आम्ही गेल्या वर्षी रक्षाबंधनादिवशी दिवशी ही योजना लागू केली होती. त्यामुळे आम्ही पुढील वर्षी भाऊबीजेपासून ती रक्कम वाढवू शकतो.

मला प्रश्न विचारला की योजना कधी सुरू होणार? मी म्हटलं की हा निर्णय मंत्रिमंडळात घेतला जाईल. अर्थसंकल्पात त्याचा निधी दिला जाईल. भाऊबीज फार लांब होईल. रक्षाबंधनाला ही योजना सुरू झाली. त्यामुळे तेव्हापासून वाढीव रक्कम द्यायची की एक एप्रिलपासून द्यायची हे मंत्रिमंडळात ठरवलं जाईल, हे मी मांडलं, असं सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

## संपादकीय....

# ऐन थंडीत पाऊस

गेल्या काही दिवसांत तापमानात सातत्याने घट होत असल्याने शहर आणि परिसरात हुडहुडी भरवणारी थंडी जाणवत होती. मात्र, 'फेंगल' चक्रीवादळामुळे आता थंडीचा जोर कमी होऊन आता तापमान वाढण्यासह आकाळ ढगाळ झाले आहे. ढगाळ आकाशाची स्थिती आणखी काही दिवस राहणार असून, हलक्या स्वरुपाच्या पावसाचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे. हवेतील कमी झालेली आर्द्रता, कोरडे झालेले वातावरण, उत्तरेकडून येणारे वारे अशा कारणांमुळे शहर आणि परिसरात गारवा वाढला होता. तसेच किमान तापमानात घट होत राहिल्याने थंडीचा जोर वाढत गेला होता. शहरातील पाषाण, शिवाजीनगर अशा काही ठिकाणी ८-९ अंश सेल्सियसपर्यंत तापमान कमी झाले होते. मात्र बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या फेंगल चक्रीवादळामुळे वातावरणात बदल होऊन थंडीचा जोर कमी झाला आहे. हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार पुण्यात रविवारी १३.३ अंश सेल्सियस, तर सोमवारी १७.४ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले आहे. त्यामुळे गेल्या दोन दिवसांत शहरातील तापमान ७ अंश सेल्सियसने वाढल्याचे दिसून येत आहे. ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ अनुपम कश्यपी म्हणाले, की फेंगल चक्रीवादळामुळे हवेतील आर्द्रता वाढली आहे. तसेच किमान तापमानात वाढ झाल्यामुळे थंडी कमी झाली आहे. ही स्थिती आणखी दोन-तीन दिवस राहू शकते. त्यानंतर पुन्हा तापमानात घट होऊन थंडी पडू शकेल. दरम्यान, हवामान विभागाने ८ डिसेंबरपर्यंत आकाश ढगाळ राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. तसेच ५ आणि ६ डिसेंबर रोजी हलक्या ते अतिहलक्या स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे नमूद केले आहे.

# सामाजिक व आर्थिक समतेसाठी लढणारा डॉ. आंबेडकर

महाडच्या चवदार तळयातील सर्वांसाठी म्हणजेच अस्पृश्यांना पाणी मिळत नव्हते. पाणी म्हणजे जीवन, तेच त्यांच्यापासून हिरावून घेतले यासाठी सत्याग्रह करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मार्च १९२७ रोजी सत्याग्रही तळयाकडे निघाले. माणुसकीचे हक्क व निसर्गाची देणगी जे पाणी, ते मिळवायचेच एवढयासाठी चालेले होते. डॉ. आंबेडकर सर्वांच्या पुढे होते. अस्पृश्य म्हणून मुंबईच्या कॉलेजात ज्यांनी पाण्याचे हाल सोसले, बडोद्याच्या हॉटेलमध्ये ज्यांनी मार खाल्ला ते खरोखरच सत्याग्रहींचे सेनापती शोभत होते. सर्वजण तळयाजवळ येऊन पोहोचले, प्रथमत: त्यांनी पाण्याचा घोट घेऊन इतरांना पाणी पिण्याची मोकळीक दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिवन म्हणजे भारतीय जनतेच्या समतेच्या लढयाची अविस्मरणीय गाथा होय. दलितोत्ध्दारक, धर्मसुधारक, प्रकांडपंडीत, समाजशास्त्रज्ञ व संविधानाचे शिल्पकार असे विविध पैलू त्यांच्या जिवनाशी निगडीत आहेत. अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा विचार करता, तत्कालीन सामाजिक, राजकिय प्रश्नांना ते कसे सामोरे गेलेत या प्रश्ना प्रमाणेच राष्ट्रीय एकात्मतेचा विचार ही त्यांनी केला. या सर्व बाबींचा मागोवा घेणे अभ्यासाचा विषय आहे. तेव्हा आपला समाज एक संघ असला पाहिजे, यावर त्यांचा अधिक भर होता. सर्व समाज शहाणा करुन सोडावा ही त्यांची कल्पना होती. जे-जे आपणांसी ठावे, ते-ते इतरांशी सांगावे, शहाणे करुनही सोडावे सकल जण हा रामदासांचा संदेश त्यांनी आचरणात आणला आणि इतरांना सुध्दा सांगीतला, या संदेशाकडे डोळेझाक करुन चालणार नाही.

नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी ५ वर्षे सतत झगडत राहिले शेवटी १९३५ मध्ये नाशिकचे काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले. त्याचवेळी बौध्द धर्म स्विकारणार अशी घोषणा त्यांनी येवले (नाशिक) या ठिकाणी केली. त्या दरम्यान बहिष्कृत भारत नावाचे नियतकालिक सुरु केले. आपल्या भारत देशात इंग्रजांचे राज्य होते नंतर १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र्य झाला. भारतातल्या लोकांना विशिष्ट पध्दतीने राज्यकारभार करता यावा यासाठी भारताची स्वतंत्र्य राज्यघटना असणे आवश्यक झाले. त्या दृष्टीने भारतीय विद्वानांची एक घटना (तज्ञ) समिती नियुक्त करण्यात आली. त्यात बॅरी. तेजपाल सप्रु, बॅरी. जयकर आणि बॅरि. आंबेडकर हे होते. परंतु उर्वरित दोन तज्ञांनी नकार दिल्यामुळे पं. जवाहरलाल नेहरुंनी ही जबाबदारी बॅरी. आंबेडकर यांच्यावर सोपविली, ती त्यांनी स्विकृत केली. एवढा मोठा कायदेतज्ञ असलेल्या या महात्म्याचे पूर्वजीवन मात्र अत्यंत वाईट गेले असतांना बेदरकारपणे आगपाखड करता आली असती, पण ती सुध्दा त्यांनी केली नाही. अशावेळी देखील बहिष्कृतांच्या चळवळीला वर्ग लढयाचे स्वरुप येणे सहज शक्य होते, त्यातून भारतीय एकसंघतेला तडा जाऊन धमच्या नांवावर या देशाची शकले झाली. तशी परिस्थिती उद्भवली असती परंतू भारतीय हा त्यांचा स्थायीभाव होता. भारतीय समाजात त्यांना बदल हवा होता पण त्यासाठी समाजप्रबोधन हाच



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

मार्ग होय, अशी त्यांची दृढनिष्ठा होती. त्यामुळेच राष्ट्रनिष्ठा त्यांनी कधी सोडली नाही. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार त्यांनी सर्वात महत्वाचा मानला.

स्वत: बरोबर इतरांचा विचार करुन त्यांनी राष्ट्रनिष्ठे पुढे इतर निष्ठा गौण मानल्या. आपण सर्व भारतीय आहोत ही भावना रुजविणे व वाढविणे महत्वाचे आहे. या निष्ठेला कोणतीही निष्ठा स्पर्धा करु शकत नाही. संकुचित जातीय, धार्मीक किंवा राजकिय व अन्य स्वार्थासाठी त्यांनी राष्ट्रनिष्ठा सोडली नाही. त्यांची ही भावना स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेत सहभागी होतांना, कायदामंत्री असतांना रिपब्लीकन पक्ष काढतांना, धर्मांतराची घोषणा करतांना अशा महत्वाच्या जीवनप्रसंगी सतत जागी राहिल्याचे दिसेल. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यांना राष्ट्रपुरुष संबोधले पाहिजे. खरोखरच डॉ. आंबेडकरांना वगळून हा देश मोठा झाला असता काय ? याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. डॉ. आंबेडकरांची कायदामंत्री म्हणून निवड करण्यात आली. त्यांनी अहोरात्र कष्ट करुन मोठया कष्टाने आपल्या अंगी असलेली सगळी बुध्दिमत्ता प्राणपणाला लावून २ वर्षे ११ महिने १७ दिवसात घटना लिहून पुर्ण केली. त्यामुळे त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून संबोधले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर जेवढी जबाबदारी होती तेवढी जबाबदारी जगातील कोणत्याही पुरुषावर नव्हती. ते जर अजुन जगले असते तर कदाचित त्यांच्या मनासारखे निश्चित घडले असते, हे कोणीही नाकारु शकत नाही.



भीमाच्या शिक्षणासाठी रामजींनी अतोनात कष्ट घेण्याचे ठरविले होते. आपल्या मुलाला प्रखर बुध्दीमत्तेची दैवी देणगी लाभली असल्याचे ओळखून भीमाच्या हिंदु समाजातील एका अडाणी व क्रुर रुढीमुळे त्याकाळी अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या जातीत जन्मल्यामुळे काही जणांकडुन क्षणोक्षणी अपमान होऊ लागला. पण त्यातही त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या केळुसकर गुरुजींच्या प्रोत्साहनामुळे व मार्गदर्शनामुळे भिम उत्तम तऱ्हेने मॅट्रीकची परीक्षा १९०७ साली पास झाला, चाळीतील लोकांनी मोठा थाटात सत्कार केला. रामजी पुढे मुलांच्या शिक्षणासाठी मुंबईस आले. भीमाने मुंबई सारख्या एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये प्रवेश केला. जातीने अस्पृश्य असल्याने भिमाला इच्छा असूनही संस्कृतचा अभ्यास करता आला नाही. पार्शियन भाषेत मात्र त्याचा पहिला नंबर असे. आनंदाची अभ्यासातील प्रगती बेताचीच असल्याने त्यास नोकरीला लावले, नंतर आनंद व भीमाचे लग्न केले. लग्नाच्या वेळी भीमा १४ वर्षाचा रमा ९ वर्षाची होती.

बडोदे सरकारची शिष्यवृती मिळवून एल्फिन्स्टन कॉलेजात प्रवेश घेतला. कॉलेजात शिक्षण देखील भीमा महार असल्यामुळे त्याला योग्य मार्गदर्शन व मदत मिळाली नाही. तरीही तशाच परिस्थितीत भीमराव एल्फिन्स्टन कॉलेज मधुन १९१२ साली बी.ए. झाले. बडोद्याच्या महाराजांच्या ऋणातून अल्पसे मुक्त होण्यासाठी त्यांनी त्यांचेकडे नोकरीचा अर्ज केला त्यांना सयाजीराव गायकवाडांच्या कडे नोकरी मिळाली. परंतु वडिल आजारी असल्याची तार मिळताच डॉ. आंबेडकर मुंबईस निघाले. सुरत स्टेशनवर वडिलांसाठी बर्फी घ्यावी म्हणून ते उतरले असताना गाडी निघून गेली. त्यामुळे घरी पोहोचण्यास त्यांना उशीर झाला. वडिलांचे डोळे मुलाला पाहण्यासाठी आतूर झाले होते. मुलगा आल्याचे कळताच त्यांनी डोळे उघडले. आपल्या लाडक्या मुलाच्या अंगावरुन प्रेमाने हात फिरविला आणि त्या महान पुरुषाने हया जगाचा शेवटचा निरोप घेतला. बडोद्याच्या प्रागतिक राजे सयाजीराव साहेबांनी शिष्यवृत्ती देऊन त्यांना अमेरिकेत पाठविले. आपण केवळ शिक्षणासाठी अमेरिकेत आलो आहोत याची जाणीव भीमरावांना होती. एखाद्या तपस्व्या प्रमाणे त्यांनी उपासना केली. ते अभ्यासात दिवसाचे अठरा तास घालवू लागले. १९१५ साली ते एम.ए. झाले. त्यानंतर त्यांनी निरनिराळया विषयांवर दोन-तीन प्रबंध लिहिले. हया कष्टांचे फळ म्हणून १९२४ साली कोलंबिया विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही पदवी दिली. सरकारी कचेरीत त्यांना मोठया हुद्याची जागा देण्याऐवजी केवळ २२५ रुपयांवर खर्डेघाशी करावी लागू लागली. हाताखालचे लोक देखील त्यांना पाणी देत नसत व त्यांच्या टेबलावर दुरुन फाईल टाकत. मानी भीमरावांना मिळत असलेली ही वागणूक पसंत नव्हती. त्यांचा स्वाभिमान दुखावला गेला म्हणून ते मुंबईला परतले.

एवढे झाले तरीही त्यांनी धीर खचू दिला नाही, थोडीशी खटपट करुन त्यांनी सिडेनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची जागा मिळवली, पैसा जमवला व १९२० साली ते अपुर्ण अभ्यास करण्यासाठी पुन्हा एकदा लंडनला रवाना झाले. तिथे ते सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत निरनिराळया ग्रंथालयात पुस्तके वाचीत आणि रात्री दहानंतर दिवस उजाडेपर्यंत त्यांचा अभ्यास चालू असे, त्याचे फळ १९२३ मध्ये लंडन विद्यापीठाने त्यांना दिलेली डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी होय. बहिष्कृत वर्गावर वर्षानुवर्षे जो अन्याय होत आलेला आहे तो वेशीवर टांगून त्याचे निराकरण झाले पाहिजे ही त्यांची मागणी होती. बहिष्कृतांचा हा लढा लढतांना त्यांनी नेमही विधायक आणि व्यापक भूमीका घेतली आणि अस्पृश्य समाजाला स्वत:हुन काही करावेसे वाटावे या दृष्टीने त्यांच्यात चैतन्य निर्माण करायचे अशा दृष्टीने त्यांनी आपल्या कार्याची पाऊले पुढे टाकण्यास सुरुवात केली. त्यापैकी पहिली सुरुवात म्हणजे १९४० साली त्यांनी सुरु केलेले पाक्षिक मुकनायक हे होय.

पिकते तेथे विकत नाही हा सिध्दांत माहित आहे, तेव्हा आपल्याजवळ असलेल्या माणसाचे गुण आपण आेळखु शकत नाही. दूसऱ्या माणसाला त्याची पारख होते हे सर्वविदित आहे. म्हणूनच १ जून १९५२ रोजी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही तत्त्वांचा पुरस्कार करणारे अनेक ग्रंथ लिहिले, भाषणे दिली आणि आपली दलिताबद्दलची भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या प्रेरणेने शाळा, प्र-शाळा तर निघाल्याच पण उच्च शिक्षण देणारी महाविद्यालयेही निघाली. शिक्षण, समाजकल्याण, अर्थकरण, राजकरण या सर्वामध्ये त्यांनी आपले स्वतंत्र, तर्कशुध्द विचार मांडून दाखविले. दलित समाजात जागृती होत गेली तेव्हा त्यांना ज्ञानाचे महत्व पटले. अनेक दलित आज समाजात विचारवंत म्हणून मान्यता पावले आहेत, त्यामागे डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा आहे. समाजाने त्यांच्या विषयीचा आदर अनेक प्रकारे व्यक्त केला आहे. आज त्यांचे नाव दिलेली कितीतरी विद्यालये, महाविद्यालय, विद्यापीठे कार्यरत आहेत.

हिंदु धर्मातून परधर्मात जाण्याचा विचार करतानाही भारतातच उगम पावलेल्या बौध्द धर्म याची नागपूर शहरात आपल्या लाखो अनुयायासह १४ ऑक्टोंबर, १९५६ रोजी बौध्द धम्माची दीक्षा घेतली. आपण जो धम्म घेतला तो उत्तमरीतीने पाळण्याचा निर्धार केला पाहिजे, नाहीतर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीत आणला असे होऊ नये म्हणून आपण दृढनिश्चय केला पाहिजे हे आपल्याला साधेल तर आपण आपल्याबरोबर देशाचा इतकेच काय तर जगाचाही उध्दार करु. कारण या धर्माचे लोन जागतीक पातळीवर उंचावत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निंधनाने सामाजिक व आर्थिक समतेसाठी लढणाऱ्या एका झुंजार योध्दयाला आज भारत देश मुकला आहे, अशा या थोर महापुरुषाच्या ६८ व्या महापरिनिर्वाणदिनी पुण्यस्मरण !

# कोल्हापूरमध्ये ५३ वा थानपीर विजय दिवस होणार साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : रेंदाळ तालुका हातकणगले येथे थानपीर माजी सैनिक परिवार कोल्हापूर यांच्यावतीने १९७१ च्या युद्धात सहभाग घेतलेल्या सैनिकांचा सत्कार व शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. हा कार्यक्रम गुरुवार दिनांक ५ डिसेंबर २०२४ सकाळी ९ वाजता स्थळ हॉटेल रिलॅक्स इन बोरगाव रोड रेंदाळ तालुका हातकणगले जिल्हा कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी १३महार रेजिमेंट च्या सर्व माजी सैनिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आव्हान थानपीर माजी सैनिक परिवार कोल्हापूर यांच्या वतीने आव्हान करण्यात आलेले आहे.

# शावळचे शिवापद गवळी यांचे सामाजिक कार्य लोकांना देतात हॉटेल मध्ये मोफत नाष्टा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट तालुक्यातील शावळ या गावी एक ७५ वर्षाचे गृहस्थ मागील ३० वर्षापासुन लोकांची मोफत पोटभरून नाष्टा देऊन सेवा करत आहेत. पौष्टिक आहार मिळावे म्हणुन त्यांनी शुद्ध रिफाइनरी तेल, आणि चांगल्या प्रतीचे बेसन सुद्धा वापरतात, आलेल्या लहान थोरां ना अदबीने नमस्कार करून त्यांना मनसोक्त पोटभरून नाष्टा खाऊ घालणे, रोज गोरगरीब लोकाना अन्नदान करणे, त्याचप्रमाणे बाहेर गावाहून आलेल्या लोकांकडे पैसे नसले तरी ते मोफत पोटभरून नाष्टा खाऊ घालतात, तुमच्याकडे पैसे असेल तर द्या नसेल तर राहू द्या, पण माझ्या होटल ला आलात तर पोटभरून नाष्टा खावून जावा, ही त्यांची वृत्ती त्यांनी कायम ठेवली आहे, आज अन्नदान सर्वश्रेष्ठ दान म्हणुन ते मनोभावे लोकांची सेवा करत आहेत, मग यांचे होटल कसे चालते? हा प्रश्न तुम्हाला पडला असेल नाही का? चला याबद्दल सांगतो,

सुमारे ३० वर्षापूर्वी यांचे गुरू श्री. सिद्धलिंग महाराज जे स्वामी अवतार होते, यानी मनोभावे भक्ती करून त्यांना प्रसन्न केले, पण कितीही भक्ति केली तरी तुम्ही आमचा विचार करत नाही, कृपया माझ्या आयुष्यात कायम असेच होत राहील का? म्हंटल्यावर साक्षात स्वामी नी त्यांना स्वप्नात येऊन दृष्टांत दिले, की शावळ या गावी येणार्या वाटसरूंना तू फक्त पाणी देत बस, त्यांची काळजी घे, लोकांची निरंतर सेवा करत रहा, संपत्ती, मोहमाया चा जास्त विचार करू नकोस, जितक लोकाना तू अन्नदान करशील तितक तुझी भरभराट होईल. असे दृष्टांत घडल्यानंतर त्यांनी बाहेरगावाहून येणार्या लोकाना पोटभरून



नाष्टा, चहापाणी करत राहिले, पण येणार्या लोकानी फक्त मोफत का खायचे?? म्हणुन त्यांना दान पण देत राहिले, पण तुम्ही इतक च पैसे द्या, तितकेच पैसे द्या असे कधीही बोलले नाहीत, आधी त्यांच्या मोफत नाष्टा असल्याने कोणती कीमत आणि भाव फलक सुद्धा नव्हती, लोक यायचे मनसोक्त पोटभरून खायचे, पैसे द्यावे वाटले तर द्यायचे, अन्यथा काहीनी सेवा सुद्धा करून मोठे मन करून त्यांना थोडे फार जास्त सुद्धा द्यायचे, पण कालांतराने लागणारे साहित्य जरी त्यांना कमी पडले तरी त्यांच्या कडे असलेली संपत्ती त्यांनी विकून कर्जबाजारी झाले पण ते लोकांची सेवा करत राहिले, आज त्यांच्या हॉटेल ची स्थिति तितकी चांगली नाही, त्यांच्याकडे आज खरच पैशाचा खूप तुटवडा आहे पण तरीही आजतागायत ते कोणालाही पैसे न मागता जितक येतात त्यावर ते अन्नदान करत राहतात, सकाळी ६ वा. हॉटेल उघडून, दिवसभर हॉटेलमधे भजी, उप्पीट, पूरीभाजी, खारा-चिवडा, लाडू, वडापाव, सांबरवडा इत्यादी सर्व बनवतात, येणाऱ्या लोकांना मनसोक्त चहा नाष्टा ची सेवा करतात, अक्कलकोट मध्ये आल्यानंतर मी अन्नदान साठी कायम ५०० ते हजारांची देणगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळा मध्ये देत असतो, पण आता जेंव्हा मला वेळ मिळतो तेंव्हा या आजोबाच्या हॉटेल ला जाऊन यथाशक्ति देणगी देऊन त्यांचे शुभ आशिर्वाद घेत असतो.

तुम्ही जर अक्कलकोट ला आलात तर या महान दानशूर व्यक्तीला जरूर भेटा, कारण त्याच्या मधुर वाणीने च त्याच्या हॉटेलमधे गेल्यानंतर तर तुम्ही तृप्त व्हाल च, पण त्यांच्या हातची चव घेतल्याने तुम्हाला खूप आनंद होईल, पैसे असेल तर द्या नसेल तर राहू द्या, पण प्रेमाचे दोन शब्द अपेक्षा करणार्या या दानशूर व्यक्ति ला तुम्ही नक्की भेट द्या, शिवाय ज्याना याना मनापासुन अन्नदान सेवेमध्ये सहभागी होऊन सेवा करायची आहे त्यांनी यांना यथाशक्ति देणगी सुद्धा देऊ शकता.

हॉटेलचे नाव : सेवा Traders , Shaval bus stand,

अक्कलकोट पासून २० किमी. अंतरावर आणि अक्कलकोट स्टेशन पासुन १० कि.मी. अंतरावर हे गाव आहे.

संदीप पाटील

# मनोज जरांगे पाटील यांनी विठ्ठल रुक्मिणी मातेचे घेतले दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे सरकार स्थापन होताच मराठा आरक्षणाची दिशा ठरवणारा असून मुंबईत आझाद मैदानावर आंदोलनाची शक्यता आहे. असे विधान पंढरपूर मराठा आरक्षणाचे प्रणेते मनोज जरांगे पाटील यांनी केले ते पुढे म्हणाले की अंतर्वली इथे घराघरातील मराठा सामूहिक आंदोलन करतील मात्र मुंबई ते सामूहिक आंदोलन होऊ शकत नाही राज्यातील मराठ्यांची लई इच्छा आहे मात्र सरकार स्थापन होताच एकत्र बसून ठरवली जाईल असे म्हणत मराठा आरक्षणासाठी मनोज जणांनी पाटील पुन्हा एकदा सरकारला इशारा देत आंदोलनाच्या तयारीला असल्याची दिसते. पंढरपूर येथे आज विठ्ठलाचे दर्शन घेतल्यानंतर गोरगरीब मराठ्यांच्या आरक्षणाचा विषय मार्गी लावण्यासाठी आरक्षण आंदोलनात बळ व शक्ती आणि आशीर्वादाची त्यांनी विठ्ठलाकडे मागणी व साखळी घातल्याचे सांगितले.



मराठा समाजाच्या आरक्षणाचा विषय मार्गी लागावा यासाठी लवकरच पुढील दिशा ठरवण्यात ठरवणार आहे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत या संदर्भात मनोज जाणगे पाटील म्हणाले की मराठा समाजाला म्हणालो होतो कोणत्याही कोणालाही पाडा कोणालाही निवडून आणा त्यांनी उमेदवार पाडले आणि निवडून आणले सुद्धा मैदानात श्री मी आणि माझा मराठा समाज नव्हतो पण नाही जर मैदानात असतो आणि आमची समीकरण जुळले असते तर यांचा चोपडा साप केला असता मी लोकसभेला पण तेच सांगितले होते कोणालाही निवडून आणा आणि कोणालाही पाडा मी माझ्या बोलण्यातून लोक कधीही जात नाही आणि मी समाज विकू शकत नाही तसेच कोणाच्या दावणीला पण बांधू शकत नाही मतदानाचा मालक समाज आहे मी त्यांना शेवटपर्यंत मालक ठेवलं मी समाजावर कोणतेही मनमानी चालवली नाही असे स्पष्टीकरण त्यांनी यावेळी दिले.

समाजाच्या राजकीय घडामोडीला त्यांना प्रश्न विचारला असता ते म्हणाले सरकारच्या राजकारणाचा प्रश्नावर मी बोलू शकत नाही मी एवढे सांगतो की मी आरक्षण घेणार आणि ओबीसीतूनच घेणार सरकारमध्ये कोणी पण बसू देत ५० ते ५५ टक्के आम्ही त्यांचे पळता भुई थोडी करू आतापर्यंत अंतरवाली येथे निवडून गेलेले ३० ते ३२ आमदार मला येऊन भेटून गेले आहेत राज्याचे सरकार स्थापन झाल्यानंतर अजून येथील मुख्यमंत्रीपद कोणालाही मिळू देत परंतु गोरगरीब जनतेला याची सुख नाही गोरगरीब जनतेची कामे करत नाहीत जनता मुंडक्यावर बसत असते असा इशाराही त्यांनी यावेळी दिला राज्याचा येणारा मुख्यमंत्री बहुजनाच्या हिंदुत्वाचा साठी गोरगरीब जनतेसाठी पुरोगामी विचाराचा कुणी आले तरी गेले ७५ वर्ष पुढील उपोषण मुंबई आझाद मैदानावर पुढील दिशा आम्ही ठरवणार आहे. आता मी आरक्षण घेतल्याशिवाय माघार नाही असाही इशारा त्यांनी बोलताना दिला आहे.

# सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून दि. ०१ डिसेंबर २०२४ सकाळी ०८ वा.पासुन ते १५ डिसेंबर २०२४ रात्री ०८ वा.पर्यंत या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) व ३७ (३) (अ ते फ) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत, असे अपर जिल्हादंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे. या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे. हा आदेश अत्यावश्यक सेवा, तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजाविताना उपरनिर्दीष्ठ वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक (ग्रा.), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू होणार नाहीत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### वाहनाच्या धडकेत मुलगा जखमी; चालकावर गुन्हा दाखल

सोलापूर : वाहनाच्या धडकेत मुलगा जखमी झाल्याची घटना ३० नोव्हेंबर रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास राजेंद्र चौक येथे घडली. याप्रकरणी चांदणी विकास सरवदे (वय-२२-,रा.जोशी गल्ली) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून वाहन क्रमांक एम.एच.१३.एडी.५८९२ यातील चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी या स्वतः करिता गोळी आणण्यासाठी सिटी हॉस्पिटल राजेंद्र चौक येथील मेडिकलमध्ये पायी चालत गेल्या असता, त्यावेळी मेडिकलमध्ये गोळी न मिळाल्याने फिर्यादी त्यांच्या मुलासह घराकडे जात होत्या. त्यावेळी अचानक वरील क्रमांकाच्या चालकाने फिर्यादी यांचा मुलगा रुद्र याला मागून धडक मारल्याने खाली पडून चेहऱ्यावर व कानावर किरकोळ मार लागून जखमी झाला.तसेच चालक हा विचारपूस न करता पळून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस नाईक सोनार हे करीत आहे.

# पत्रकार हितासाठी स्वतंत्र महामंडळ!

## पत्रकार संघाच्या मागण्यांना यश; महाराष्ट्र राज्य पत्रकार संघातर्फे फडणवीस यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र सरकारने पत्रकारांसाठी व स्वतंत्र विकास महामंडळ स्थापन करण्याचा ऐतिहासिक क्रांतिकारक निर्णय घेतल्या बद्दल महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

हा सत्कार राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी फडणवीस यांना साईबाबांची मूर्ती, खारीक-खोबऱ्याचा हार, डायरी, घड्याळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

सत्कार समारंभात पत्रकार संघाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे किरण जोशी.सोशल मिडिया प्रमुख सिध्दार्थ भोकरे रायगड जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे.सिंधुदुरग जिल्हा अध्यक्ष प्रसन्न गोंदवले.नगर जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे पाटील, अकोले तालुका कार्याध्यक्ष हरिभाऊ फापाळे, मंत्रालयीन प्रतिनिधी विष्णु बुरे तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

**महायुती सरकारच्या कार्यकाळात देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांसाठी स्वतंत्र विकास महामंडळ स्थापनेची मागणी मान्य करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. अखेर, सरकारने ही मागणी मान्य करत पत्रकारांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे पत्रकारांच्या समस्या सुटण्याची वाट मोकळी झाली आहे.**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने पत्रकारांच्या विविध समस्या आणि मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी नागपूर दिक्षा भुमी ते मुंबई मंत्रालय अशी संवाद यात्रा संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली होती. या यात्रेदरम्यान संघाने पत्रकारांसाठी एकूण २४ मागण्या मांडल्या होत्या.

स्वतंत्र महामंडळाच्या स्थापनेमुळे पत्रकारांना आर्थिक सुरक्षा, विमा संरक्षण, तसेच विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळेल. विशेषतः ग्रामीण आणि शहरी भागातील पत्रकारांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत. यासोबतच, महामंडळाच्या माध्यमातून पत्रकारांना विविध सुविधा आणि सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना झाल्यामुळे त्यांना काही महत्त्वाच्या सुविधा मिळू लागल्या आहेत. मात्र, अजूनही पत्रकार संघाच्या २२ मागण्या प्रलंबित आहेत. यामध्ये पत्रकारांसाठी स्थिर वेतन योजना, निवृत्तीवेतन, आरोग्य विमा, अपघात विमा, विशेष गृहनिर्माण योजना, तसेच पत्रकारांच्या कुटुंबीयांसाठी शिष्यवृत्ती योजना यांचा समावेश आहे.

पत्रकार संघाने उर्वरित मागण्या तातडीने पूर्ण करण्याची विनंती सरकारकडे केली आहे. यामध्ये सर्व पत्रकारांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याचा आग्रह धरण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी पत्रकार संवाद यात्रेचे एक विशेष पुस्तिका देवेंद्र फडणवीस यांना प्रदान करण्यात आली. यानंतर उपस्थितांनी महामंडळाच्या माध्यमातून पत्रकारांच्या हितासाठी प्रभावी निर्णय घेतले जातील, असा विश्वास व्यक्त केला.

या ऐतिहासिक निर्णयामुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात एक नवे पर्व सुरू होणार असून, पत्रकारांचे हक्क आणि सुरक्षा सुनिश्चित होण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडले आहे. महाराष्ट्रातील पत्रकारांनी या निर्णयाचे स्वागत करत फडणवीस आणि त्यांच्या टीमचे आभार मानले आहेत.

# राज्यातील हजारो पत्रकार आजाराने त्रस्त; व्हॉईस ऑफ मीडियाच्या तपासणीत धक्कादायक अहवाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : सुधाकर रणदिवे राज्यातील हजारो पत्रकार आजारी असल्याची माहिती पुढे आली आहे. 'व्हॉईस ऑफ मीडिया' या पत्रकारांच्या आंतरराष्ट्रीय पत्रकारांच्या तपासणीत हा धक्कादायक अहवाल पुढे आला आहे. या आजारी असणाऱ्या पत्रकारांची संख्या जेव्हा हजारोच्या प्रमाणात आहे असे कळल्यावर पत्रकारिता क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

मागच्या तीन महिन्यात 'व्हॉईस ऑफ मीडिया' या पत्रकारांच्या संघटनेने राज्यभरात पत्रकारांच्या तपासणीचे कॅम्प, शिबीर, हे तालुका, जिल्हा, शहर या ठिकाणी आयोजित केले होते. राज्यभरात १४८ ठिकाणी या आरोग्य तपासणीचे आयोजन केले गेले होते. ज्यात प्रिंट, टीव्ही, रेडिओ, डिजिटल मीडियाच्या ७८०० पत्रकारांची तपासणी केली गेली. यात तपासणी केलेल्या १३२८ पत्रकारांना शुगर, २९१२ पत्रकारांना बीपी, १०२० पत्रकारांना थायरॉड झाल्याचे आढळून आले.यात अन्य छोटे छोटे आजार असणाऱ्या पत्रकारांची संख्या ६१३ होती. ७८०० मध्ये पाच हजारावून अधिक आजारी असल्याचे पुढे आले आहे. या सर्व पत्रकारांना नियमित औषधी त्यांच्या नियमित तपासण्या करण्याचे काम सुरु आहे अशी माहिती 'व्हॉईस ऑफ मीडिया' या पत्रकार संघटनेचे आरोग्य विंगचे प्रमुख भीमेश मुतुला यांनी सांगितले आहे. जे पत्रकार आजारी आहेत, त्यांना औषध, नियमित तपासणी ज्या प्रमाणे सल्ला दिलाय त्या प्रमाणे केले तर दोन महिन्यात किमान ५० टक्के पत्रकारांचे आजार कमी होतील असे मत या तपासण्या करणारे डॉ. प्रमोद अनसापुरे यांनी व्यक्त केले आहे.

**पत्रकार मित्रांनो काळजी घ्या : व्हॉईस ऑफ मीडियाचे आवाहन**

लढा पत्रकारिता आणि पत्रकारांसाठीचा...!

आम्ही आरोग्याच्या उद्देशाने शासनाला अनेक वेळा उपाय योजना सुचवल्या, त्यांना आराखडा तयार करून दिला, पण शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. आता आम्ही शासनाविरुद्ध पत्रकारांच्या आरोग्यासाठी कायदेशीर लढाई लढणार आहोत. असे 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे कायदेशीर सल्लागार अंड संजीवकुमार कल्लकोरी यांनी सांगितले. आम्ही पत्रकारांना वाऱ्यावर सोडणार नाही. त्यांची काळजी आम्ही घेऊ. आम्हाला मदत करायला शासनाला लाज वाटत असेल तर शासनाच्या भिकेची गरज नाही असा संताप 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के पाटील यांनी व्यक्त केला आहे. पत्रकारांनो तब्बेतीची काळजी घ्या असे आवहान 'व्हॉईस ऑफ मीडिया' च्या वतीने राज्यातील सर्व पत्रकारांना करण्यात आले आहे. येत्या जानेवारी महिन्यात सर्व जिल्हा आणि तालुक्याच्या ठिकाणी आजारी पत्रकारांच्या तब्बेतीची फेर तपासणी करण्यात येणार आहे. तसेच सर्व पत्रकारांसाठी नियमित कॅम्प घेतले जाणार आहेत अशी माहिती 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे राज्य उपाध्यक्ष अजितदादा कुंकूलोळ यांनी दिली आहे.

# सुंदरपुर परीसरात बिबट्याचा धुमाकूळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील सुंदरपुर येथे बिबट्याने धुमाकूळ घातला असून सुंदरपुर परीसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे

नुकतेच जनार्दन धोंडीराम सोमवंशी यांचे शेतात ऊस तोडणी सुरू असुन बिबट्याने दुपारीच्यावेळी अचानक ऊस तोड कामगारांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला , ऊसतोड कामगारांनी प्रसंगावधान राखत बिबट्याला पळून लावण्यासाठी प्रयत्न करत होते, परंतु बिबट्या शेतातून दुर गेला नाही, या कठीण प्रसंगी राजेंद्र सोमवंशी यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना फोन करून बिबट्याची खबर दिल्या नंतर वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ पिंजरा घेऊन त्या ठिकाणी हजर झाले , जोपर्यंत बिबट्या जात नाही तो. पर्यत सर्वजण थांबून राहिले होते पण बिबट्या गेला नाही म्हणून



ऊसतोड बंद करावी लागली असून ,.जोपर्यंत बिबट्याचा बंदोबस्त करीत नाही तोपर्यंत आम्ही ऊसतोड बंद ठेवणार आहे, असे ऊसतोड कामगारांनी सांगितले, असून शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील ऊसतोड कशी करावीअसा

**शेतकऱ्यांवर नवे संकट, बिबट्याचा बंदोबस्त करा तरच आम्ही ऊस तोडू; ऊसतोड कामगारांचा इशारा**

प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला, आहे..दोन ते तीन दिवसात आम्ही बिबट्याचा बंदोबस्त करतो असे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना आश्वासन दिले . परंतु ग्रामस्थ ऐकायला तयार नाही एक ते दोन बिबटे असुन ते न घाबरता हल्ला करतात , सर्व ग्रामस्थ घाबरून गेले असुन परिसरातील शेतकऱ्यांना शेतीला पाणी देण्यासाठी रात्री अपरात्री जावे लागते ,त्यातच परिसरामध्ये बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकऱ्यांच्या जीवावर बेतण्यासारखे आहे, पिकांना पाणी देणे अशक्य होत असून. बिबट्याच्या दहशतीची चिंता व्यक्त केले जात आहे, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळावे व शेतकऱ्यांनाआपली शेतीची कामे भुयमुक्त वातावरणात करता यावी व बिबट्याचा बंदोबस्त तात्काळ करावाअशी मागणी वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडे सुंदरपुरचे सरपंच राजेंद्र सोमवंशी व राजेंद्र सोनवणे, आदेश सोमवंशी, बाळकृष्ण तांबे, भाऊराव बर्डे ,श्रीपत पवार, रवींद्र साळवे, गुलाब पवार, समाधान सोमवंशी, कैलास सोमवंशी, आदी,ग्रामस्थांनी केली आहे

# मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांचे रिपाइं आठवले गटाच्या वतीने सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतीनीधी : मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा दुसऱ्यांदा पदभार घेतल्याने संदीप कोहिनकर यांचे रिपाइं आठवले गटाचे वतीने सत्कार करण्यात आले.

सोलापूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर हे दुसऱ्यांदा त्यांच्याकडे २१ दिवसांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार दिल्याने रिपाइंच्या वतीने त्यांच सत्कार रिपाइं अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी रिपाइं तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे,गौतम मडिखांबे,शिवराज जमगे,गणेश कांदे उमेश पांढरे,आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय हरित सेनेची निसर्ग भ्रमंती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोडगांव देवी/प्रतिनिधी : अर्जुनी मोरगांव येथील सरस्वती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय हरित सेने तर्फे दिनांक १ डिसेंबर २०२४ ला निसर्ग भ्रमंतीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना पक्षी,कीटक,वनस्पती त्यांचा जीवनक्रम,त्यांचे परिसंस्थेतील महत्त्व, मानवास असलेले फायदे व त्यांचे जतन करण्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचे हेतूने या भ्रमंतीचे आयोजन करण्यात आले. सदर भ्रमंती जैवविविधता उद्यान, त्या शेजारील तलाव, जंगल परिसर व कोसावाडी या ठिकाणी काढण्यात आली. सकाळी ७:३० वाजता पासून १०:०० वाजता पर्यंत विविध वनस्पती, कीटक व पक्षी यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली यामध्ये बेहडा,ऑस्ट्रेलियन बाभूळ,खस,लाजरी,सरू,पळस इत्यादी वनस्पतींची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.तसेच





शेकाट्या,कनई,ढोकरी,गाय बगळा इत्यादी पक्षी व जायंट वूड स्पायडरची माहिती सुद्धा देण्यात आली. त्यानंतर कोसावाडी येथील रेशीम केंद्रास भेट देऊन रेशीम किड्याचा जीवनक्रम ओंकार लांजेवार यांनी समजावून दिला. निसर्ग भ्रमंतीमध्ये वर्ग नववीच्या ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यशस्वीतेसाठी शिवचरण राघोर्ते,अमर वसाके,उषा मेश्राम, दिपाली कोट्टेवार व किरण पर्वते यांनी प्रयत्न केले.

# प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांची भेट घेतली तरीही आ. मोहिते पाटलांवर कारवाई होणारच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या विरोधात काम करणारे विधानपरिषद सदस्य रणजीत सिंह मोहिते पाटील यांना पक्षातून बडतर्फ करण्यात यावे, अशी शिफारस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केले आहे. दरम्यान आ. मोहिते पाटील यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन आम्ही एकनिष्ठ आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. असे असले तरी पदावरून पक्ष हिताची काम केलेली आहे हे दिसून येत नाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि पालकमंत्री चंद्रकांत पाटील यावर योग्य ती भूमिका घेतील



**भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत**

आणि भाजपच्या विरोधात काम करणाऱ्या आ. रणजितसिंह मोहिते पाटलावर कारवाई करतील भाजप प्रदेशाधिकेचे केंद्रेकर बावनकुळे यांची भेट घेतली तरी पक्षविरोधी कारवाया करणाऱ्या आ. रणजीत सिंह मोहिते पाटलावर कारवाई होणारच अशी माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांनी दिली.

### वटवृक्ष मंदिरात मुंबईच्या श्री स्वामी समर्थ भजन मंडळीची सेवा

### वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर चेअरमन महेश इंगळे यांचे प्रतिपादन

# आध्यात्माच्या उन्नतीकरीता भजन सेवेसारखे उपक्रम मोलाचे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : सद्गुरु श्री स्वामी समर्थ नामाचा प्रचार आणि प्रसार या कार्याअंतर्गत जप, नामस्मरण, किर्तन भजन, गायन या सेवा म्हणजे अध्यात्मिक उन्नती सोबत स्वामी सेवकांसाठी भक्ती प्रेमाचे हक्काचे व्यासपीठ हे ध्येय समोर ठेवून येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात भजनी मंडळाकडून भजन सेवेच्या मागणीनुसार भजन सेवेचे आयोजन करण्यात येत असते. या भजन सेवेत स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी महोत्सवातील भजनी मंडळांसह वर्षभरात ही राज्यातील विविध भजनी मंडळाकडून भजन सेवा स्वामी चरणी समर्पित होत असतात. या अनुषंगाने आज येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील ज्योतिबा मंडपात मुंबईच्या श्री स्वामी समर्थ जय शंकर भक्त परिवारची भजन सेवा संपन्न

श्री स्वामी समर्थांच्या चरणी समर्पित झाली. आजच्या भजनी मंडळाच्या भजन सेवेसह सालाभरात मंदिरात भजनी मंडळाच्या वतीने स्वामी समर्थांच्या चरणी समर्पित होणाऱ्या भजन सेवांच्या माध्यमातून आध्यात्माच्या उन्नतीकरीता भजन सेवेसारखे उपक्रम मोलाचे असल्याचे मनोगत येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिराचे चेअरमन महेश इंगळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुंबईच्या श्री स्वामी समर्थ भजनी मंडळाचे कलाकार मंदार सावंत, अनिल कोळवणकर, दिनेश साळवी, पांडुरंग आमले, शिवाजी निकम, शिल्पा साळवी, प्राची चिले, सुनिता सरवडे यांचा महेश इंगळे यांनी श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी महेश इंगळे बोलत होते. श्री स्वामी समर्थ भजनी मंडळाच्या वतीने आज संपन्न झालेल्या या भजन सेवेत भजनी मंडळाच्या कलाकारांनी स्वामींचा गजर, यावे गजा वदन यावे, तारी तारी स्वामी राया, अक्कलकोटचे स्वामी वंदितो तुमचा मी, शंकर बाबा हात जोडतो, तुमही देव आदींसह विविध भाव भक्ती गीते गाऊन उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत स्वामी सेवेचे ऋण व्यक्त केले. या कार्यक्रमास भक्त श्रोत्यांनीही मोठी गर्दी केली होती.



## थोडक्यात...

### बोलीभाषा एकांकिका स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

सोलापूर : भाषेच्या विविध बोलींची ही स्पर्धा या वर्षी आठव्या वर्षात पदार्पण करत आहे. बोलीभाषा एकांकिका स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. २०१६ साली सुरू झालेली 'बोलीभाषा एकांकिका स्पर्धा' ही आगळी वेगळी एकांकिका स्पर्धा ठरली, जिची संकल्पना वस्त्रहरणकार लेखक गंगाराम गवाणकर यांची आहे व तिला मूर्तरूप प्रसिद्ध नाट्यनिर्माते गोविंद चव्हाण यांनी दिले आहे. पहिल्या वर्षापासूनच या स्पर्धेला स्पर्धकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. या सात वर्षांत स्पर्धकांनी प्रेक्षकांना सुद्धा वेगवेगळ्या बोली अनुभवायला दिल्या. यंदाही ही स्पर्धा होणार असून यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अद्वितीय असल्यामुळे खूप प्रसिद्ध झाली. आज ज्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्याच भाषेच्या विविध बोलींची ही स्पर्धा या वर्षी आठव्या वर्षात पदार्पण करत आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ९९३०४६६९२४ या मोबाईल क्रमांकावर वर संपर्क साधावा, www.supriyaproduction.com या संकेतस्थळाला भेट द्यावी. असे आवाहन करण्यात आले आहे.

# विष्णूपद मंदिर येथे मंदिर समिती मार्फत पुरेसा सोई सुविधा

## विष्णूपद उत्सव २०२४ : गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : मार्गशिर्ष शुध्द ०१ ते मार्गशिर्ष वद्य ३० या कालावधीत श्री विठ्ठलाचे वास्तव्य विष्णूपदावर असते, अशी धारणा आहे. त्यामुळे महिनाभर विष्णूपद येथे दर्शनास भाविकांची गर्दी असते. यावर्षी दिनांक ०२ ते ३० डिसेंबर २०२४ दरम्यान विष्णूपद उत्सव संपन्न होत असून, या उत्सवास दिनांक ०२ डिसेंबर पासून सुरवात झाली असून, गोपाळपूर रोडवरील विष्णूपद मंदिर येथे मंदिर समिती मार्फत भाविकांना पुरेसा सोई सुविधा उपलब्ध करून दिल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

मंदिर समितीने पंढरपूर शहर व परिसरातील २८ परिवार देवता सन २०१५ मध्ये ताब्यात घेतल्या असून, त्याचे व्यवस्थापन मंदिर समिती मार्फत चालविण्यात येते. त्यामध्ये गोपाळ-पूर रोडवरील चंद्रभागा नदीपात्रातील विष्णूपद मंदिराचा समावेश असून, या ठिकाणी दर्शनरांगेसाठी बॅरीकेटींग, सुरक्षा व्यवस्थेकामी कमांडोज, पिण्याच्या पाण्याची सोय, चांगली स्वच्छता व्यवस्था, अभिषेक पुजा भाविकांना उपलब्ध करून देणे, विद्युत रोषणाई व इतर अनुषंगीक व्यवस्था करण्यात आली आहे.

सदर ठिकाणी वन भोजनाची प्रथा असल्याने स्वच्छतेसाठी जादा कर्मचा-याची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पंढरपूर नगरपरिषद प्रशासन व पोलीस प्रशासन यांना देखील पत्रव्यवहार करून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

विष्णूपद मंदिर येथे एका मोठ्या शिळेवर मध्यभागी देवाचे समचरण आणि देहुडाचरण पावलं उमटलेली आ-हेत. त्यासोबत काठी ठेवल्याची आणि काल्याच्या वाडग्याची खूण दिसते. या शिळेवर दगडी मंडप उभारण्यात आला आहे. या मंडपाच्या खांबावर चतुर्भुज समचरण विष्णुमूर्ती आणि देहुडाचरण मुरलीधराची मूर्ती कोरण्यात आली असून, विठ्ठलाने आपल्या सवंगड्यासह व गाईंसह क्रीडा केल्या व भोजन केलं. तेव्हा इथं देवाची आणि गाईची पावलं उमटली. विठ्ठल हे विष्णूचे अवतार असल्यानं इथं उमटलेल्या पावलांमुळे या ठिकाणाला विष्णुपद असं नाव मिळालं. मार्गशीर्ष महिन्यात विठुराया या ठिकाणी निवासाला येतो, असं मानलं जातं. त्यामुळे मार्गशीर्ष महिन्यात या ठिकाणी भाविक दर्शनासाठी मोठी गर्दी करतात. याशिवाय, भाविक नौकानयनाचा आनंद घेतात व दर्शन घेऊन वनभोजनाचा आनंद लुटतात. येथे येणाऱ्या सर्व भाविकांना मंदिर समिती मार्फत पुरेशा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देऊन तेथील सर्व प्रथा व परंपरेचे पालन करण्याची दक्षता मंदिर समितीने घेतल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.




**लोकप्रिय आमदार श्री सचिन दादा कल्याणशेट्टी यांचा सत्कार करते वेळेस लोकसेवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष. तथा मागासवर्गीय सेलचे तालुका उपाध्यक्ष भाजपा विठ्ठलराव तुकाराम वाघमारे व हुसैन पुजारी जीवन ख्याले बाबासाहेब वाघमारे पवार व.बनसोड. बाबासाहेब वाघमारे हे.उपस्थित होते**

# आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांचा माजी सैनिकांच्या वतीने सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला तालुक्याचे नवनिर्वाचित आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांचा सत्कार जय जवान माजी सैनिक सेवाभावी संस्था सांगोला व कल्याणकारी संस्था सांगोला तसेच आजी माजी सैनिक संघटना वासुद-अकोला शिकणे, सोनंद, पाचेगाव, मांजरी, हिंगरगे, महिम, मानेगाव, यांच्याकडून वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन या भावनेतून विविध प्रकारच्या झाडांची रोपे देऊन एक अनोखा प्रकारचा सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

त्यावेळी सर्व संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी माजी सैनिकांना सर्व प्रकारच्या मदतीची आश्वासन देत देश सेवेसाठी योगद-ान देणारी माजी सैनिक वीर माता वीर पत्नी व त्यांच्या कुटुंबीयांचे प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचे आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.



**एक जानेवारी २०२५ च्या भीमा कोरेगाव सलामी मानवंदनेच्या संदर्भात समाज कल्याण आयुक्त, बार्टी महासंचालक, जिल्हाधिकारी पुणे, पोलीस आयुक्त पुणे शहर या सर्वांना भेटून कार्यक्रमाच्या संबंधित चर्चा करून पत्र देण्यात आले खालील मान्यवर उपस्थित होते शिवपुत्र घटकांबळे, संतोष वानखेडे साहेब, भगवान इंगोले साहेब,विश्वनाथ जाधव साहेब, गोरखनाथ गायकवाड साहेब, अशोक हावळे साहेब असे उपस्थित राहून कामाची पूर्तता करण्यात आली.**

# उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे एड्स दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जिल्हा रुग्णालय नाशिक येथील कार्यरत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे , निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप सूर्यवंशी यांचे आदेशान्वये उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील कार्यरत डॉ राजीव तांभाळे वैद्यकीय अधिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली १डिसेंबर, जागतीक एड्स दिनानिमित रॅली चे आयोजन करण्यात आले होते.




जागतिक एड्स दिन प्रत्येक वर्षी १ डिसेंबरला साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश एचआयव्ही/एड्ससंबंधी जागरूकता वाढवणे, या आजाराबाबत असलेले गैरसमज आणि कलंक दूर करणे तसेच या आजाराशी झुंज देणाऱ्या लोकांना आधार देणे हा असुन. दरवर्षी जागतिक एड्स दिनासाठी एक विशिष्ट विषय निवडला जात असून. या वर्षा साठीचा विषय मार्ग हक्काचा, सन्मानाचा हा निवडण्यात आला आहे, उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे कार्यरत नितिन परदेशी, समुपदेशक, आय सी टी सी विभाग यांनी एड्स दिनाचे महत्त्व खालील प्रमाणे विशद केले आहे . जागरूकता निर्माण करणे: लोकांना एचआयव्हीच्या कारणांबद्दल , प्रतिबंधात्मक उपायांबद्दल आणि उपचारांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधांबद्दल माहिती उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना दिली. तसेच टोल फ्री क्रमांक १०९७ वकखत/खऊड २०१७ कायदा बाबत माहिती देण्यात आली तसेच कलंक दूर करणे: एचआयव्ही संक्रमित व्यक्तींविषयी समाजात असलेल्या नकारात्मक दृष्टिकोनाचा विरोध केला जातो. आधार आणि प्रोत्साहन: एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्यांना आधार देऊन त्यांना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली जाते. यावेळी डॉ राजीव तांभाळे यांनी जागतीक एड्स दिनाचे साजरीकरणाचे स्वरूप सांगितले

एचआयव्ही/एड्स दिन खालील प्रकारे साजरा केला जातो: शैक्षणिक कार्यक्रम: शाळा, महाविद्यालये, आणि सार्वजनिक ठिकाणी जागरूकता शिबिरे आणि चर्चासत्रांचे आयोजन करणे, आरोग्य तपासणी शिबिरे: मोफत एचआयव्ही तपासणी आणि समुपदेशन शिबिरे राबविणे, जागतिक संकल्पना: एचआयव्हीबाबत जागरूकता पसरवण्यासाठी रेड रिबन घालणे, जे एड्सविरुद्धच्या लढ्याचे प्रतीक असुन मार्च आणि रॅली: स्वयंसेवी संस्था आणि आरोग्य विभागांच्या वतीने रॅली काढून जनजागृती केली जाते. तसेच मीडिया आणि समाजमाध्यमांचा वापर: एड्स आणि एचआयव्हीशी संबंधित महत्त्वाची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रभावी मोहीम राबवली जाते. पराग चव्हाण, औषध निर्माण अधिकारी यांनी या जनजागृतीत सहभागी होण्यासाठी पुढील उपाय बाबत माहिती सांगितले आरोग्य शिबिरांमध्ये भाग घेणे: तपासणी करून स्वतःचा एचआयव्ही स्टेटस जाणून घ्या. रेड रिबन वापरणे: या प्रतीकाद्वारे एड्सग्रस्तांसाठी आधार आणि जागरूकतेची भावना व्यक्त करा. दान करणे: एचआयव्हीबाधित लोकांसाठी काम करणाऱ्या संस्थांना सहाय्य करा. आदी माहिती दिली. डॉ. लाड यांनी एच आय व्ही/एड्स आजाराबाबत माहिती दिली. सामाजिक माध्यमांवर प्रचार: या दिवसाचे महत्त्व आणि एचआयव्हीशी संबंधित माहिती शेअर करा. एचआयव्ही/एड्सला रोखण्यासाठी जागरूकता आणि शिक्षण हाच सर्वात प्रभावी उपाय आहे. जागतिक एड्स दिनाचा संदेश आपल्या जीवनात आणि समाजात रुजवणे आपल्यासाठी खूप महत्त्वाचे आहे असे सांगितले

या प्रसंगी उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील कार्यरत डॉ लाड डॉ साहेबराव गावले,डॉ कविता कदम, डॉ संकेत आहेर, डॉ योगिता कुटे , चंद्राते सचिन गोसावी, विशाल विशे, भाऊसाहेब कोल्हे, पौर्णिमा कोंडके, मंगल बोरसे, वर्षा शिंदे, जनार्दन परदेशी, ऋषिकेश सानप, निकिता तंवर, सुनील राठोड व वैनेतय महाविद्यालय येथील प्राचार्य सोनवणे बी आर, उपप्राचार्य गुजराथी , टकले , गुंजाळ , काकड बी एस , शिंदे आर एस आदी उपस्थित होते.


# इंडियन मॉडेल स्कूलचा जिशान मेलीनमनी याचा शालेय राष्ट्रीय हॉकी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : जिल्हा अधिकारी क्रीडा कार्यालय नांदेड यांच्यामार्फत आयोजित राज्यस्तरीय हॉकी निवड चाचणी घेण्यात आली. या निवड चाचणी-तून अक्कलकोट येतील इंडियन मॉडेल स्कूलच्या जिशान मेलिनमनी याची १७ वर्षाखालील मुलांच्या वयोगटातून रोहतक हरियाणा येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय हॉकी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. या खेळाडूला राज्य क्रीडा मार्गदर्शक जरार कुरेशी, क्रीडाशिक्षक दयानंद दणूरे व सहशिक्षक संतोष सोनकंटले हॉकी प्रशिक्षक अवेज होटगी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष शिध्दाराम



म्हेत्रे उपाध्यक्ष अमोल जोशी, संस्थेचे सचिवा शितलताई म्हेत्रे सायली जोशी मॅडम, बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणपती वाघमोडे, शाळेच्या मुख्याध्यापिका गौरी दातार मॅडम, यानी या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनासाठी नियोजन बैठक मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. कोकण विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी लाखो अनुयायांसाठी वाहतूक, आरोग्य, स्वच्छता व सुरक्षा यावर भर देण्याचे निर्देश यावेळी दिले.**

## विद्यार्थ्यांनी केली सामूहिक सुंदर प्रार्थना

## केंद्रप्रमुख सुभाष पानपट्टे यांचे प्रतिपादन

# जो करील मनोरंजन मुलांचे, जडेल नाते प्रभूशी तयांचे!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोंढे सांगवी केंद्र कापशी या शाळेत सौ. सुप्रिया लांडगे यांच्या बदली झालेल्या निरोप प्रसंगी वरील उदगार सुभाष पानपट्टे यांनी काढले. जि प प्रा शा लोंढे सगळी येते काल सुप्रियाताई प्रमोदराव लांडगे मॅडम यांची समायोजनाने बदली झाल्यामुळे निरोप समारंभ घेण्यात आला. पहिल्या प्रथम सावित्री बाई फुले यांचे प्रतिमापूजन सरांच्या शुभहस्ते झाले. नंतर विध्यार्थ्यांनी सामूहिक सुंदर प्रार्थना घेतली.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री आत्माराम पाटील शिंदे सर मुख्याध्यापक लोंढे सांगवी हे होते. या कार्यक्रमाचे सूत्रबद्ध संचालन श्री अनिलजी कोत्तावार सर यांनी केले. या निरोप प्रसंगी गावातील सर्व नागरिक सर्व शिक्षक आणि विद्यार्थी गण उपस्थित होते. सौ सुप्रिया ताई लांडगे यांनी या शाळेमध्ये सात वर्षांमध्ये अतिशय मेहनत घेवून दर्जेदार, उपक्रम राबवून गुणवत्ता विकास आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदर शाळेची पटसंख्या घसरल्याने, त्यांची समायोजनाने बदली जि प के प्रा शा मारतळा येथे झाली आहे. शाळेच्या वतीने त्यांना निरोप देण्यात आला. त्याप्रसंगी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पानपट्टे सर यांनी आणि त्यांच्या कामाचा गौरव केला आहे. विद्यार्थ्यांना ज्ञान ज्ञानाचे धडे देताना, आनंददायी शिक्षण आणि मनोरंजन केले आहे. त्यामुळे त्यांनी साने गुरुजीच्या उक्तीचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला,जो करील मनोरंजन मुलांची जडेल नाते प्रभुशी तयांचे..... आवर्जून उल्लेख केला. भविष्यात त्यांचा उत्तम नागरिक त्यां बरोबर बरोबर देश घडविण्याचा संकल्प करावा ही शुभकामना त्यांनी दिली. त्यांनी उत्कृष्ट सेवा दिल्यामुळे हे गाव त्यांना कधीही विसरणार नाही. असे हीशेवटी म्हणाले. याच कार्यक्रमांमध्ये सौ रुद्रावार मॅडम यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. रुद्रावार मॅडम यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना अभिष्टचिंतन व्यक्त करण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे उपक्रमशील शिक्षक श्री अनिल कोत्तावार सर,श्री रमाकांत तुंबर्फले सर, श्री बालाजी कदम सर, श्री भालचंद्र लोंढे यांनी परिश्रम घेतले. शाळेचे मुख्याध्यापक श्री आत्माराम शिंदे सर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत मांडले. शेवटी




रमाकांत तुंबर्फले सर यांनी आभार मानून कार्यक्रम सांगता केली.